# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.10.2023** **वार – सोमवार**

---

**गांधी जयंती**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त आज पुण्यात विविध संस्था संघटनांकडून त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. गांधी जयंती निमित्त राष्ट्रीय निसर्गोपचार संस्था, तसंच पुणे मेट्रोनं आज एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. यावेळी केंद्रीय संचार ब्यूरोच्या कलाकारांनी भाव्यांजली हा गांधी भजनांचा कार्यक्रम सादर केला. कार्यक्रम स्थळी पुण्याचे मूर्तीकार आणि चित्रकार उत्तम साठे यांनी शाडू मातीच्या सहाय्याने महात्मा गांधीजींचं शिल्प साकारलं.

महात्मा गांधींच्या जयंतीनिमित्त पुणे शहर जिल्हा काँग्रेस समितीनं महात्मा गांधींच्या जीवनावर आधारित सुमारे 100 दुर्मिळ छायाचित्रांचं प्रदर्शन भरवलं आहे. भवानी पेठेतील श्री शिवाजी मित्र मंडळातर्फे, गणेशोत्सवात अहोरात्र सेवा देणाऱ्या 21 सफाई कर्मचाऱ्यांचा आज महात्मा गांधी जयंतीनिमित्त कृतज्ञता सन्मान करण्यात आला.

**आकाशवाणी**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या स्थापनेला आज सत्तर वर्षे पूर्ण झाली. सात दशकांपासून हे केंद्र श्रोत्यांच्या सेवेत अविरत कार्यरत आहे आणि पुण्याच्या सांस्कृतिक वारशामध्ये त्याचं स्थान यापुढेही अढळ राहील. आकाशवाणी पुणे केंद्राचा स्थापना दिन आज उत्साहात साजरा करण्यात आला.

**विज्ञान भारती**

पुण्यात उद्या सायन्स ट्वेंटीच्या पुढील चर्चासत्राचं आणि राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. विज्ञान भारती पश्चिम महाराष्ट्र विभाग, भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमी आणि भारतीय उष्णप्रदेशीय हवामानशास्त्र संस्था यांनी संयुक्तपणे याचं आयोजन केलं आहे. शाश्वत विकासासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नावोन्मेशाला पोषक वातावरणनिर्मिती, ही या परिषदेची संकल्पना आहे.

**ज्येष्ठ नागरिक**

पुण्यातील कर्वे समाजकार्य महाविद्यालयात उद्या ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात येणार आहे. ज्येष्ठ नागरिकांमध्ये जागरुकता वाढवण्यासाठी आर्थिक, सायबर गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन आणि परिसंवाद यावेळी होणार आहे.

**किशोर कुलकर्णी निधन**

ज्येष्ठ गायक आणि संगीतकार किशोर कुलकर्णी यांचं काल पुण्यात अल्पशा आजाराने निधन झालं. ते 58 वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर काल रात्री पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. गाण्याचं प्राथमिक शिक्षण त्यांनी पंडित यशवंतबुवा मराठे आणि त्यानंतर खाँसाहेब मोहम्मद हुसेन खाँ यांच्याकडून घेतलं. त्यानंतर अनेक वर्ष पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्याकडे अध्ययन केलं. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांचा त्यांना प्रदीर्घ सहवास लाभला. त्यांच्या 'भावसरगम' आणि 'शिवकल्याण राजा' या कार्यक्रमांमध्ये ते अनेक वर्ष गात होते. स्वतः संगीतबद्ध आणि स्वरबद्ध केलेल्या "नादातून या नाद निर्मितो, श्रीराम जय राम जय जय राम" या गोंदवलेकर महाराजांच्या गजरामुळे ते मराठी रसिकांच्या घराघरात पोहोचले. गुजरा हुआ जमाना,

दिनू तैसी रजनी या कार्यक्रमांची निर्मिती तसंच स्वामी समर्थ, गजानन महाराज यांच्यावरील रचनांमुळे त्यांनी संगीत विश्वात वेगळी छाप निर्माण केली.

**क्रीडा**

एसएनबीपी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या अखिल भारतीय स्तरावरील 16 वर्षांखालील मुले मुली गटाच्या हॉकी स्पर्धा म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात सुरू आहेत. यामध्ये तेलंगणच्या  बोंगीर हॉकी अकादमी, तमिळनाडू हॉकी संघ आणि झांशी तील स्पोर्ट्स हॉस्टेल या संघानी आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजयी सलामी दिली.

**क्रीडा**

नाशिकमध्ये पुढील आठवड्यात 37 वी राज्यस्तरीय मैदानी स्पर्धा होणार आहे.यासाठी पुणे जिल्हा संघ जाहीर करण्यात आला आहे. वीस वर्षाखालील गटात मुलांमध्ये आर्यन कदम तर मुलींमध्ये कल्पना मडकमी यांच्याकडे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. अठरा वर्षाखालील गटात मुलांच्या संघाचे नेतृत्व माधव दरक तर मुलींच्या संघाचे नेतृत्व ऋतुजा भोसले करणार आहे.

**क्रीडा**

नांदेडमध्ये तिसरी राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धा सुरू आहेत. सतरा वर्षाखालील मुलींच्या गटाची उपउपांत्यपूर्व फेरी पार पडली. त्यामध्ये पुण्याच्या रुचिका दारवटकर, राधिका संकपाळ आणि आनंदीता लुणवत यांनी उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली. तर मुलांच्या गटात प्रणव खेडकर, प्रणव घोलकर, नील मुळे या पुण्यातील खेळाडूंनी उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

**पाऊस**

चालू हंगामात आत्तापर्यंत पुणे जिल्ह्यात मोसमी पाऊस, समाधानकारक झाल्याची आकडेवारी हवामान विभागानं जारी केली आहे. त्यानुसार सरासरीच्या केवळ 3 ते 6 टक्के कमी पाऊस झाला असून पुढील काही दिवस आणखी पाऊस अपेक्षित असल्यानं, सरासरीएवढा किंवा त्याहून अधिक पाऊस यंदा जिल्ह्यात होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यंदा पाऊस उशिरा सुरू झाला आणि जून त्याचबरोबर ऑगस्ट महिना तुलनेत कोरडे गेले. मात्र जुलै आणि सप्टेंबरमध्ये झालेल्या दमदार पावसामुळं सरासरी भरून निघण्यास मदत झाली आहे..

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश ढगाळ होतं. उद्याही असंच हवामान राहून कमाल तापमान 30 अंश सेल्सियसच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**